


दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
जर तुम्हाला आनंदी आयुष्य जगायचे असेल तर माणसांवर किंवा गोष्टींवर लक्ष केंद्रित न करता, तुमच लक्ष ध्येयावर केंद्रित करा...
– अल्बर्ट आइंस्टाइन

वर्ष : ०५ | अंक : ६१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१५ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# निवडणुकांसाठी सज्ज व्हा!

## स्थानिक स्वराज्य संस्थांत लोकप्रतिनिधींचं राज्य येणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, छत्रपती संभाजीनगर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल नोव्हेंबर महिन्यापासून वाजण्यास सुरुवात होणार आहे. जानेवारी अखेरपर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पूर्ण होऊन लोकप्रतिनिधींचे राज्य सुरु होईल. नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका- नगरपंचायत, त्यानंतर जिल्हा परिषद आणि त्यानंतर महापालिकेच्या निवडणुका होतील. दर वीस दिवसांनी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांच्या तयारीला दिवाळीनंतर वेग येईल असे मानले जात आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी अखेरपर्यंत घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या दृष्टीने आयोगाने तयारी सुरु केली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी गटांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडतदेखील काढण्यात आली. महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना तयार करण्यात आली, त्याला मान्यतादेखील देण्यात आली. आता येत्या काही दिवसांत प्रभागातील वॉर्डांच्या आरक्षणाची सोडत निघेल, महापौरपदाचे आरक्षणदेखील जाहीर होईल असे मानले जात आहे. नगरपालिका-नगरपंचायतीसाठीच्या निवडणुकीचीदेखील तयारी केली जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या तयारीच्या दृष्टीने राजकीय पक्षांनीदेखील काम सुरू केले आहे. छत्रपती संभाजीनगरात शिवसेनेने गटप्रमुखांचा मेळावा घेतला, मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन केले. भाजपने विभागीय बैठक घेतली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीबरोबरच पदवीधर मतदारसंघाच्या तयारीच्या दृष्टीने आढावा घेतला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मोर्चा काढून लक्ष वेधले.

भाजपच्या आढावा बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संभाव्य निवडणुकीबद्दल मान्यवरांनी मार्गदर्शन केले. त्यात नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका – नगरपंचायतीची निवडणूक होऊ शकेल असे सांगण्यात आले. त्यानंतर वीस दिवसांच्या अंतराने जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल आणि ही निवडणूक होईल. जिल्हा परिषद निवडणूक झाल्यावर पुढील वीस दिवसांत महापालिकेची निवडणूक होईल अशी शक्यता मान्यवरांनी व्यक्त केली.

२०-२० दिवसांच्या अंतराने होणाऱ्या निवडणूकांची मालिका जानेवारी अखेरीस संपेल. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींचे राज्य सुरू होईल असे मानले जात आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिका एप्रिल २०२० मध्ये बरखास्त झाली, तेव्हापासून या महापालिकेवर प्रशासक राजवट आहे. जानेवारी अखेरपर्यंत निवडणूक झाल्यास पालिकेत पाच वर्षे नऊ महिन्यांनी पालिकेत लोकप्रतिनिधींची राजवट सुरू होईल.

## स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर व बल्लारपूर पोलिसांची धडक कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१४, बल्लारपूर (चंद्रपूर) :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर व बल्लारपूर पोलीसांची धडक कारवाई पोलीस ठाणे बल्लारपूर यांची उल्लेखनिय कामगीरी अशी आहे की, पोलीस ठाणे बल्लारपूर अप क. ९७५/२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. मधील फिर्यादी नामे विनय चंद्रय्या मुलकला रा. मंचेरीयल, राज्य तेलगणा ह.मु. सुभाष वार्ड, बल्लारपूर यांना दि. ०९/१०/२५ रोजी २२:०० वा. च्या सुमारास अज्ञात तिन लोकांनी मारहाण करून त्यांचे हातातील एक मोबाईल व एक सोन्याची अंगठी असा ४०,०००/- रू चा मुद्देमाल बळजबरीने चोरून घेवुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस ठाणे बल्लारपूर येथे सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासामध्ये स्थागुशा, चंद्रपूर यांनी व पोलीस ठाणे बल्लारपूर यांनी समांतर तपास करून सदर गुन्हयातील दोन आरोपी नामे सचिन सुरेश मोकलवार वय २४ वर्ष, रा. बुध्द नगर वार्ड, बल्लारपूर व करण सुदाम हजारे वय २४ वर्ष, रा. गोरक्षण वार्ड, बल्लारपूर यांना अटक करून त्यांचेकडुन एक सोन्याची ५ ग्रॅम अंगठी किं.अं. ५०,०००/- रू रोख रक्कम ९००/- रू व गुन्हयात वापरलेली मो.सा. २०,०००/- रू असा एकुण ७०,९००/-रू चा माल जप्त करण्यात आला असून तिसरा फरार आरोपीचा शोध चालू आहे.

सदर ची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे, सुधीर नंदनवार सा. उपविभागिय पोलीस अधिकारी, राजूरा, पोलीस निरीक्षक विपीन इंगळे यांचे मार्गदर्शनात सपोनि मदन दिवटे, सपोनि शब्बीर पठाण, सफौ. रणविजय ठाकुर, आनंद परचाके, पोहवा. सत्यवान कोटनाके, संतोष दंडेवार, संतोष पंडीत, पुरूषोत्तम चिकाटे, सुनिल कामतकर, विकास जुमनाके, पो. अंमलदार शरदचंद्र कारूष, मिलींद आत्राम, खंडेराव माने, लखन चव्हान, पो.ना. सचिन अल्लेवार, म.पो. अंमलदार शालिनी नैताम, इत्यादी पो. स्टाफ यांनी अतिशय कुशलतेने केली असुन पुढील तपास सपोनि शब्बीर पठाण हे करीत आहेत.

## पालशेत येथे अवैध वाळू उपसा !

### तहसीलदारांच्या धडक कारवाईत वाहन ताब्यात...

### अवैद्य वाळू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले...

**अक्षराज : उदय दणदणे**



**दि.१४, पालशेत (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील पालशेत येथे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून पालशेत येथील समुद्रकिनारी अवैधपणे सुरू असलेल्या वाळू व्यवसायावर गुहागर तहसीलदारांनी स्टिंग ऑपरेशन केले आहे. दरम्यान वाळू उपसा करून वाहतूक करणारे वाहन ताब्यात घेतल्याने अवैद्य वाळू व्यवसाय करणाऱ्या सर्वांचेच धाबे दणाणले आहेत. गुहागर तहसीलदार परीक्षित पाटील यांनी गुरुवारी रात्री अचानक पालशेत समुद्रकिनारी फेरफटका मारला असता पालशेत येथे खुलेआम सुरू असलेल्या अवैद्य वाळू व्यवसायाबाबत त्यांना माहिती मिळाली होती,मात्र यावर आपले प्रशासकीय विभाग कोणतेच कारवाई करत नव्हते यामुळे त्यांनी स्वतःच या कारवाईकडे लक्ष दिले असल्याने पहिल्याच फेरीत वाळू उपसा करून वाहतूक करणारे वाहन मिळून आले आहे, सदर वाहन गुहागर पोलीस परेड मैदानामध्ये आणून लावण्यात आले आहे.

सदर वाहन पालशेत येथील कीर नामक व्यक्तीच्या नवावर असल्याचे कळते, मात्र प्रत्यक्षात वेगळाच व्यक्ती त्या ठिकाणी वाळूचा अवैध व्यवसाय करत आहे. आणखी दुसरी गाडी ही कारवाई होत असल्याचे समजताच तिथून पलायन केल्याचे बोलले जात आहे. या अगोदर पालशेत येथील या अवैद्य व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर आवाज उठवणारे तेथील ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांच्यावरही हल्ले झाल्याची घटना घडल्या आहेत. अशा या अवैध वाळू उपसा करणाऱ्यां व्यवसायावर तहसीलदार परीक्षित पाटील यांनी धडक कारवाई केल्याने या अवैध धंद्याला आळा बसेल असा विश्वास व्यक्त होत आहे.

मात्र या कारवाईबाबत येथील तलाठी व सर्कल अधिकारी यांच्याकडे कारवाई झाल्याची कल्पना/ माहिती उपलब्ध नसल्याने याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे.

मात्र अवघ्या वीस फुटावर वाहतूक करणारे वाहन उभे असताना सर्कल अधिकारी यांना आपल्या भागातील या कारवाई बाबतची कल्पनाच नाही अशा बोलण्याने नक्की वाळू मुरते कुठे !? अशी शंका व्यक्त होत आहे. पकडण्यात आलेल्या अवैद्य वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर तहसीलदार नेमकी कोणती कारवाई करतात याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

## सणासुदीच्या काळात अहिल्यानगर अशांत?

### बदलत्या राजकारणाचा बाजारपेठेवर परिणाम होण्याची भीती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, अहिल्यानगर :** ऐतिहासिक वारसा लाभलेले अहिल्यानगर सध्या तणावपूर्ण आणि अस्थिर वातावरणातून जात आहे. दिवाळीसारख्या प्रमुख सणाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली ही परिस्थिती जिल्ह्याच्या सामाजिक सलोख्यावर आणि आर्थिक वातावरणावर सावट घालणारी ठरत आहे. गेल्या काही महिन्यात राजकीय समीकरणात झालेल्या उलथापालथीमुळे, सामाजिक आणि धार्मिक तणाव वाढत असून, शांततेसाठी ओळखल्या जाणाऱ्या नगर जिल्ह्यात चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

**अतिवृष्टी आणि तणावग्रस्त वातावरण !**

सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीने शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. त्याचवेळी पैगंबरांच्या नावाची विटंबना झाल्याच्या प्रकरणामुळे शहरात दोन गटांमध्ये तणाव निमर्ण झाला आणि पोलिसांना लाठीमार करावा लागला. त्यानंतर एमआयएम पक्षाचे नेते असदुद्दीन ओवेसी यांची सभा, त्यानंतर एका महामानवाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य, आणि शेवटी हिंदुत्ववादी संघटनांचा मोर्चा या घटनांच्या मालिकेमुळे शहरातील शांततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

**पोलिसांवर आता सुव्यवस्था राखण्याचे मोठं दडपण आलं**

प्रशासन आणि पोलिसांवर आता सुव्यवस्था राखण्याचे मोठं दडपण आलं आहे. सणासुदीच्या काळात ही जबाबदारी आणखी वाढली आहे. नागरिक आणि व्यापारी वर्ग दोघांमध्येही अशा घटना मूळ प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी होत आहेत का? असा सवाल निर्माण झाला आहे.

**अहिल्यानगर जिल्ह्याचं बदलतं राजकीय समीकरण...**

नगर जिल्हा सुसंस्कृत आणि संतुलित राजकारण्यांसाठी ओळखला जात होता. मात्र अलीकडच्या काही महिन्यांत झालेल्या राजकीय बदलांमुळे चित्र पालटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्णयानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली, आणि त्यांच्या पाठोपाठ आमदार संग्राम जगताप यांनीही हिंदुत्ववादी भूमिकेकडे कल दर्शवला. एका विशिष्ट धर्माविषयी सातत्याने टीका करून सामाजिक तणाव वाढवणाऱ्या त्यांच्या वक्तव्यांवर टीकास्त्र सुरू आहे. नागरिकांच्या मते, विकासासाठी निवडून दिलेल्या आमदारांना आता विकासापेक्षा राजकीय संदेशवहनात रस वाढल्याचे दिसून येत आहे.

**बाजारपेठेवर संकटाची छाया**

दिवाळीसारख्या सणांच्या काळात बाजारपेठेत नेहमी उल्हासाचे वातावरण असते. मात्र, सध्या व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम आणि भीतीचं वातावरण आहे. ऑनलाईन खरेदीकडे वाढता कल आणि शहरातील अशांतता यामुळे प्रत्यक्ष व्यापारात घट होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. एक उद्योजक म्हणाले, सणासुदीच्या काळातच वर्षभरातील कमाई होते, पण आता लोक बाहेर पडायला घाबरत आहेत. अशा परिस्थितीत लवकरात लवकर स्थैर्य प्रस्थापित झाले नाही तर नगरची पारंपरिक बाजारपेठ ओस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ओवेसींची सभा आणि जलीलांचे वक्तव्य...**

९ ऑक्टोबर रोजी मुकुंदनगर येथे एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांच्या सभेला मोठी गर्दी झाली होती. या सभेत माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आमदार जगताप व राणे यांच्यावर केलेल्या वक्तव्यावर वाद निर्माण झाला. मात्र, जगताप समर्थकांनी संयम दाखवला आणि पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. राजकीय वाद वाढत गेले तर भविष्यात अशा संघर्षांचा परिणाम थेट नागरिकांवर आणि व्यापारावर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

**आमदारकीच्या शपथेचा विसर?**

आमदार म्हणून संग्राम जगताप यांनी घेतलेल्या शपथीनुसार त्यांना संविधानाशी खरी निष्ठा राखणे आणि सर्व धर्म, जातींच्या समानतेचा आदर राखणे अपेक्षित आहे. मात्र, अलीकडच्या विधानांनी हा शपथविधी केवळ औपचारिक ठरला का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. संविधानाच्या कलम १८८ नुसार द्वेषभावना निर्माण करणारे वक्तव्य हे थेट संविधानविरोधी ठरते, असे कायदेविशारद सांगतात.

**काय करायला हवे?**

अहिल्यानगरला पुन्हा शांततेच्या मार्गावर आणायचे असेल, तर सत्तासंघर्ष, धर्मीय वाद आणि द्वेषपूर्ण भाषण यांना थारा न देता सामाजिक एकोपा आणि विकास या दोन गोष्टींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन अफवांना आळा घालावा, तर नागरिकांनीही संयम आणि जबाबदारीने वागावे.अहिल्यादेवींच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या शहरात त्यांच्या सुशासन, शांतता आणि लोककल्याणाच्या मूल्यांचे प्रतिबिंब पुन्हा दिसणे, हीच काळाची गरज आहे. शांतता आणि एकोपा हाच जिल्ह्याच्या प्रगतीचा खरा पाया आहे.

## पुण्यातील कॉलेजमध्ये संतापजनक प्रकार !

**दि.१४, पुणे :** पुणे शिक्षणाचं माहेर घर मानलं जातं. पण याच शिक्षणाच्या माहेरघरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनी खरंच सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. त्यामागे कारणही तसंच आहे. पुण्यात गुन्हेगारीच्या घटना एकीकडे प्रचंड वाढलेल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सणासुदीच्या काळात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळाला होता. त्यानंतर गुंड निलेश घायवळच्या टोळीतील आरोपींनी दोन सर्वसामान्य नागरिकांवर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार समोर आला होता. हेही असे की थोडे आता एका महाविद्यालयात टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पुण्यात अराजकतेचं कृत्य करणाऱ्यांना कोणतही भय राहिलेलं नाही का? असा प्रश्न उपस्थित होतोय.विशेष म्हणजे शिक्षणाच्या महेरघरात विद्यार्थिनी कॉलेज प्रशासनाकडून सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आहे. एकीकडे वाढती प्रेमी युगलांची संख्या पाहता विविध प्रकार घडतानाच्या घटना समोर येत असतातच. मात्र या शिक्षणाच्या माहेरघरात विद्यार्थ्यांना सुरक्षा देण्याचं काम हे त्या प्रशासनाचा असतो. पण असं असलं तरी कुंपनच शेत खात असल्याचा प्रकार समोर आला आहे. कॉलेजच्या प्रशासनात असलेल्या एका इसमाकडूनच विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

## रेल्वेगाडीच्या धडकेत वाघाचा मृत्यू !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** सिंदेवाही- आलेवाही- नागभीड रेल्वे मार्गावर पुन्हा एकदा वन्यजीव मृत्युची घटना घडली आहे. सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील टी-४० परिसरात रविवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास एका पट्टेदार नर वाघाचा मृतदेह आढळला. हा वाघ 'बिट्टू' नावाने ओळखला जात होता.

हा वाघ १३-१४ वर्षाचा होता. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या वाघांपैकी एक मानला जाणारा हा बिट्टू वाघ होता, असे समाजमाध्यमावर चर्चा होती. हा वाघ रेल्वेगाडीच्या धडकेत ठार झाल्याचे वनविभागाच्या प्राथमिक अहवालात म्हटले आहे. गोंदिया ते चंद्रपूर दरम्यान धावणाऱ्या पॅसेंजर रेल्वेने आलेवाही ते सिंदेवाही दरम्यान या वाघाला धडक दिली. हा रेल्वे मार्ग जंगलातून जात असल्याने या भागात वाघ, बिबटे, हरणे आदी प्राणी नियमित भ्रमण करतात. मात्र, वेगवान रेल्वेमुळे अशा घटना वारंवार घडत आहेत.

घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपुरी वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सोमवारी सकाळी वाघाचा पंचनामा करुन मृतदेह टीसीसी चंद्रपूर येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी, सहायक वनसंरक्षक डॉ. महेश गायकवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकार,क्षेत्र सहायक नितीन गडपायले यांच्या मार्गदर्शनात पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

यावेळी एनजीओ प्रतिनिधी यश कायरकर, वन्यजीव रक्षक बंडू धोत्रे, एनटीसीए प्रतिनिधी मुकेश भांदककर, आणि वनरक्षक आर. व्ही. धनविजय उपस्थित होते. सामाजिक माध्यमांवर 'बिट्टू' वाघाच्या मृत्युची बातमी व्हायरल झाल्याने वन्यजीवप्रेमींमध्ये तीव्र संताप पसरला आहे.

# संपादकीय

## ‘साफसफाई’चा नाशिक पॅटर्न!

राजकीय भाऊ-दादांना ‘पाहुणचार’ देण्याचा खाकीचा ‘नाशिक पॅटर्न’ लोकांच्या पसंतीस उतरतो आहे. संपूर्ण राज्यात अशा मोहिमा राबवायला काय हरकत ?

एका नामांकित हॉटेलमधील कथित ‘हनी ट्रॅप’ अर्थात मधुसापळ्याच्या प्रकरणाने काही महिन्यांपूर्वी नाशिक अचानक चर्चेत आले होते. कुतूहलापोटी राज्यभरातून अनेकांनी फोन करून ‘हे खरं आहे का?’ अशी विचारणा केली होती. पुढे विधिमंडळात गदारोळ झाल्यानंतरही या प्रश्नी ‘डोंगर फोडण्या’ची कोणी तसदी घेतली नाही. त्यामुळे साधा उंदीरसुद्धा सापडणार नव्हताच. आता पुन्हा बाहेरून विचारणा सुरू झाली आहे. या खेपेला नाशिक पोलिस चर्चेत आहेत. खाकी वर्दीने थेट राजकीय नेतेमंडळींच्या बगलबच्च्यांना हात लावला. ‘भाऊ-दादां’ची कॉलर पकडण्याची हिंमत दाखवली. गेले आठ-दहा दिवस या मंडळींच्या ‘वराती’ सुरू आहेत. राजकीय बिळातील उंदरांना एकएक करून बाहेर काढले जाते. रोज कोणाचा ना कोणाचा नंबर लागतो आहे. ही अप्रूप अन् कौतुकाची गोष्ट न ठरावी तरच नवल!

सुवर्ण त्रिकोणातील नाशिक समृद्धी महामार्गामुळे चौकोनात आले. गाव ते शहर टप्पा पूर्ण झाल्यानंतर ते महानगराच्या दिशेने झेपावू पाहते आहे; पण चोऱ्या, दरोडे, खून अशा गंभीर गुन्ह्यांचा आलेखही उंचावतो आहे. राज्यातील राजकीय उलथापालथीत टवाळ-मस्तवाल असे सारेच राजकीय पक्षांच्या मांडवाखाली गेले. विशेषत: सत्ताधाऱ्यांच्या कळपात बडे पावन झाले, तर छोट्यांनीही काही ना काही लाभ उपटले. काहींनी त्यापुढे जात गंभीर गुन्हेगारांशी हातमिळवणी केल्याने शांततेलाच नख लागले. राज्यात सर्वदूर कमी-अधिक फरकाने अशीच परिस्थिती दिसते. ‘भाईगिरी’चे पीक अवतरणे, पोलिसांच्या नाकावर टिच्चून कोयते, तलवारी परजणे, दिवसाढवळ्या वाहनांसह वाटेल तेथे तोडफोड करून यंत्रणेला आव्हान देणे ह्याला अराजक म्हटल्यास वावगे ते काय?

संशयित-मस्तवालांना आवरण्याचा कोणी प्रयत्न केल्यास ‘वरून’ दबाव आणण्याचा प्रघातच पडलेला. नाशिकमध्ये तर पाणी डोक्यावरून गेले होते. सामान्यांचे जगणे मुश्कील झाल्याने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर का होईना, अखेर सत्ताधाऱ्यांच्या डोक्यात प्रकाश पडला अन् यंत्रणेला ‘फ्री हँड’ मिळाला. खाकीचा ‘खाक्या’ दिसू लागला अन् राजकीय कनेक्शन असलेल्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले. भाऊ, दादा, नेताजी, अण्णाजी अशी बिरुदे मिरवणारे नव्वदएक लोक कारवाईच्या टप्प्यात आहेत. घरातील भुयारांसह त्यांचे एक से बढकर एक कारनामे समोर येत आहेत. अनेकांचा चौकीत आणून ‘पाहुणचार’ होतो आहे. काहींना ऐन दिवाळीत फराळ मिळणार असल्याने त्यांचे ‘आका’ही ‘टेन्शन’मध्ये आहेत. दहशतीच्या रील्सना कारवाईच्या रील्सने प्रत्युत्तर मिळू लागल्याने माहोल एकदम बदलला आहे. ग्रामीण पोलिस आणि महापालिकेकडूनही तोच कित्ता गिरवला जात आहे.

अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, अवैध धंद्यांचा बंदोबस्त सुरू झाला आहे. वाढते गुन्हे आणि बेकायदा कृत्यांमुळे दोन-तीन वर्षे मागे गेलेले नाशिक आता किमान मोकळा श्वास तरी घेईल. कालपर्यंत यंत्रणांच्या नावाने बोटे मोडणारे जनसामान्य आता त्यांना आशीर्वाद देताना दिसत आहेत. असे होण्याची अलीकडच्या काही वर्षांतील ही पहिलीच वेळ. खमक्या पोलिस अधिकाऱ्याला कामाची मोकळीक मिळाल्यानंतर काय घडू शकते, याची प्रचिती यानिमित्ताने येत आहे.

पोलिसांनी पोलिसांसारखेच काम करणे अपेक्षित. त्यांचे आता हात मोकळे सोडले असतील, तर इतके दिवस ते कोणी व कशासाठी बांधले होते, हा प्रश्न उरतोच. असो. ‘देर आए, दुरुस्त आए’. संशयितांवर पोलिसांचा रट्टा पडत असल्याने ‘कायद्याचा बालेकिल्ला’ ही नवी टॅगलाइन नाशिकला मिळते आहे, जी आता ‘रोल मॉडेल’ बनून राज्यातील सर्वच शहरांत पोहोचावी. गुन्हेगारांचे राजकीय लागेबांधे मोडून काढण्याचा, त्यांच्या ‘साफसफाई’चा हा पॅटर्न गावागावात दिसावा, एवढीच अपेक्षा. कायदा-सुव्यवस्थेच्या रखवालदारांकडून दुसरे काय अपेक्षित?

# कराष्टमी(आठवी पूजन)आणि दिवाळीची चाहुल



हिंदू संस्कृती, परंपरा आणि कालगणनेनुसार प्रत्येक महिन्याचे दोन चरण आहेत. ते दोन चरण कृष्णपक्ष आणि शुक्लपक्ष हे होय. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेनंतर शेवटच्या येणाऱ्या अष्टमीला कृष्णपक्ष अष्टमी आणि अमावस्ये नंतरच्या अष्टमीला शुक्लपक्ष अष्टमी असे म्हणतात. तसेच प्रत्येक पंधरवाड्याच्या आठव्या दिवसाला अष्टमीतिथी मानली जाते. प्रत्येक अष्टमीला काही विशेष अशी नावे आहेत. त्याला काही वैदिक पौराणिक आधार असावा असे अभ्यासांती दिसते.

कोणत्याही महिन्यात येणाऱ्या शुक्ल अष्टमीला दुर्गाष्टमी असे संबोधन आहे. तर कोणत्याही महिन्याच्या कृष्ण पक्षातल्या(वद्य)अष्टमीला कालाष्टमी म्हटले जाते. मराठी कालगणनेनुसार चैत्र शुक्ल अष्टमीला अशोकाष्टमी, अश्विन वद्य अष्टमीला कराष्टमी म्हटले जाते. कार्तिक वद्य अष्टमीला भैरवाष्टमी (कालभैरव जयंती), कार्तिक शुक्ल अष्टमीला गोपाष्टमी (गोकुळाष्टमी वेगळी) तर श्रावण वद्य अष्टमीला गोकुळाष्टमी (जन्माष्टमी) म्हणतात. माघ वद्य अष्टमीला सीताष्टमी (सीता जयंती), ज्येष्ठ शुक्ल अष्टमीला त्रिलोचन अष्टमी, प्रत्येक महिन्यात बुधवारी येणाऱ्या शुक्ल अष्टमीला बुधाष्टमी, पौष शुक्ल अष्टमीला भीमाष्टमी, कार्तिक कृष्ण अष्टमीला कालभैरव अष्टमी, अश्विन शुक्ल अष्टमीला महाष्टमी, भाद्रपद शुक्ल अष्टमीला राधाष्टमी, मार्गशीष कृष्ण अष्टमीला रुक्मिणी अष्टमी आणि फाल्गुन वद्य अष्टमीला शाकाष्टमी (शीतलाष्टमी) अश्या विविध नावांनी विविध अष्टमीला संबोधिल्या जाते.

अश्विन महिन्याच्या या चालू सप्ताहात कृष्ण पक्ष अष्टमीला(कराष्टमी) अर्थात आठवी पूजन आहे. यालाच मातृकापूजन सुद्धा म्हणतात. येथूनच दिवाळी सहा-सात दिवसावर असते. कराष्टमी अर्थात दिवाळीची चाहूलच. खरंतर संपूर्ण अश्विन मास हा मातृशक्तीला समर्पित आहे. महिन्याच्या सुरुवातीला आदिशक्ती जगतजननी जगदंबेचे नवरात्र संपन्न झाले. कोजागिरी पौर्णिमेला शिवपार्वती, वसुबारसेला गोमाताचे पूजन आणि अश्विन अमावस्येला लक्ष्मी- कुबेर, तर आठवीला (कराष्टमीला) मातृका पूजन केले जाते. मातृका पूजनाच्या संदर्भात मार्कंडेय पुराणात देवी महात्म्यामधील रक्तबीज राक्षसाचा वध या अष्टमाध्यायात मातृकांच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आलेल्या आहेत. शिव, ब्रम्हा, विष्णू, नरसिंह, वराह, कार्तिकेय आणि इंद्र या देवतांच्या शक्ती म्हणजे मातृकाशक्ती होय. या सप्त देवतांच्या सप्तशक्ति म्हणून सप्तमातृका होय. शिवशक्ती- माहेश्वरी, ब्रह्मशक्ती- ब्राह्मणी, विष्णूशक्ती -वैष्णवी, नरसिंहाची वाराही, कार्तिकेयची- कौमारी आणि इंद्राची ऐन्द्री या सप्तमातृका होय.या


शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो.९१३०८३५४५८

सप्तमातृका आणि आठवी अर्थात आपल्या कुळाचे पालन व रक्षण करणारी कुलस्वामिनी यांचा समावेश असतो. कुलस्वामिनी देवी ही आपल्या कुळावर पुत्रांप्रमाणे वासल्यतेने प्रेम करते. तसेच ती अखंडित कृपेची छाया धरीत असते.

या कराष्टमीला (आठवी) कुलस्वामिनी ची पूजा करतात. प्रामुख्याने आठवी पूजन विदर्भात अधिक प्रमाणात केले जाते. आठवीला सकाळी अथवा सायंकाळी अंगणात किंवा घरात पाटावर आठ कुंभ मांडून एका कुंभावर पणती झाकून ठेवतात आणि कुंभावर लाल गंधाने चंद्र रेखाटतात. दुसऱ्या कुंभावर विड्याचे पान झाकण म्हणून ठेवतात. त्यावर चंद्र रेखाटतात. या कुंभाच्या उतरंडीवर ज्वारीचे अथवा उसाचे पाच धांडे घर म्हणून खोपडी लावतात. कुंभांना आठ पदराचे हळदीने रंगविले पोवते वाहतात. देवीची षडोशोपचारे पूजन करतात. प्रसाद म्हणून पुरण, आंबील, साटोऱ्या, घाऱ्या व आपल्या कुळाचाराप्रमाणे नैवेद्य दाखवितात.

वैदिक काळापासून कुंभ (घट) हे मातृशक्तीचे प्रतीक आहे. नवरात्रातील घटस्थापना ही मातृदेवतेचे पूजन कुंभ रूपात केले जाते. याच मातृरूप घटात नवनिर्मिती व सुजनतेचे सामर्थ्य असते. कुंभ हेच मातृगर्भाचे प्रतीक आहे. म्हणून आठवीच्या पूजनात कुंभाचे स्थान आणि महत्त्व दिले आहे. एकंदरीत श्रद्धा आणि मातृशक्तीप्रति कृतज्ञता तसेच कुलस्वामिनीची कृपा आपल्या कुळावर निरंतर कायम राहो हाच उद्देश आठवी पूजनाचा असावा. अनेक ठिकाणी कराष्टमी च्या (आठवी)पूजनाला ज्येष्ठागौरींचे आवाहन व पूजन सुद्धा होत असते. एकंदरीत संपूर्ण अश्विन मास हा मातृपूजक व मातृशक्तीप्रति कृतज्ञता व्यक्त होण्याचा काळ असतो.

# वाचन प्रेरणा दिन !

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सार्थ दृष्टी...



सर्वोत्तम दृष्टी दान
जीवन करी सार्थक
सोपी सरळ साधना
संतुष्ट होई साधक

दानधर्म ही संस्कृती
माणूसकीचे द्योतक
नकळत पुण्य कर्म
निर्मुलन हो पातक

नेत्र हीन वाट पाही
होऊन जणूं चातक
येईलं दाता विधाता
संकटमोक्ष स्नातक

नाव नोंदणी आधी
सुखे हसेलं मस्तक
पुण्य नोंद आपसूक
भरेलं प्रगती पुस्तक

संस्थेला कळवायचे
होता कुणी रे मृतक
सत्कर्म साधनेसाठी
दूर सारायचे सुतक

प्रकाश तिमीर देशी
उजागर होई अंधक
अक्षा सहीत प्रयाण
करेल शरीर लुब्धक

नवीनदृष्टी नवीसृष्टी
जगा अनेक शतक
नवे रूप सु स्वरूप
जणूं जनले जातक

एकाचे अवयव दान
लाखो होई उद्बोधक
मृत्यूपश्चातहीजीवीत
समर्थ दृष्टी संवर्धक

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# मातीच्या पणत्या लावा !



दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. दिवाळीला दीपावली असेही म्हटले जाते. दीपावली म्हणजे दिव्यांची रांग. दिवाळी खरेतर दिव्यांचा उत्सव. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळू हळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. सेल किंवा विद्युत प्रवाहावर चालणारे हे दिवे प्रकाश देत असले तरी पणत्यांमधून प्रक्षेपित होणारी सात्विकता यामध्ये नाही. विजेच्या कृत्रिम दिव्यांमुळे मातीचे दिवे बनवणारी आणि ती विकणारी गोरगरीब मंडळी यांच्यावर संक्रांत येऊ लागली आहे. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार ? त्यामुळे या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं!






## पालघरमध्ये लाखो आदिवासींचा जनसमुदायाचा वादळ

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१४, पालघर :** आदिवासी आरक्षणात कोणाचीही घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही. आरक्षण हा आमचा संविधानिक हक्क आहे, तो कुणाच्या बापाचा ही वारसा नाही! अशा तीव्र शब्दांत आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती, जिल्हा पालघर अध्यक्ष आमदार विलास तरे यांनी पालघरमध्ये गर्जना केली. यांच्या वतीने आयोजित 'जन आक्रोश विशाल मोर्चा' मध्ये जिल्हाभरातील लाखो आदिवासी बांधवांनी सहभाग नोंदवला.

मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळपासूनच क्रांतीवीर बिरसा मुंडा चौक, पालघर चार रस्ता परिसरात आदिवासी बांधव, महिला, तरुण, विद्यार्थी आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते जमू लागले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि घोषणांच्या रणभेरीत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघाला.

बंजारा-धनगर हटाओ, आदिवासी आरक्षण बचाओ!, हम हमारा हक मांगते, किसीसे भिख नहीं मांगते!, आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे!, बिरसा मुंडा करे ऊलगुलान – ऊलगुलान! अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. नुकताच प्रदर्शित झालेल्या कांतारा २ चित्रपटातील अभिनय दिसून आली.

मोर्चाच्या शेवटी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात बंजारा आणि धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्याच्या हालचालींना तीव्र निषेध नोंदवण्यात आला. हे पाऊल संविधानविरोधी असून आदिवासी समाजाच्या हक्कांवर आघात करणारे आहे, असे स्पष्ट शब्दांत नमूद करण्यात आले.

मोर्चानंतर झालेल्या सभेत आमदार विलास तरे यांच्यासह विविध आदिवासी नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांचे प्रतिनिधी यांनी भाषण केले. दरम्यान आमदार तरे म्हणाले की, आरक्षण हा आमचा संविधानात दिलेला हक्क आहे. बंजारा आणि धनगर समाजाची अनुसूचित जमातीत समावेशाची मागणी ही पूर्णपणे असंवैधानिक आहे. आमच्या आरक्षणावर कुणाचाही डाका चालणार नाही. सरकारने या घुसखोरीच्या हालचालींना तात्काळ आळा घालावा. तसेच, आदिवासी समाजाचा संघर्ष केवळ आरक्षणापुरता नाही, तर आपली ओळख, संस्कृती आणि अस्तित्व यासाठी आहे. 'संविधानाचा सन्मान करा, आदिवासींचा अधिकार राखा' हेच या आंदोलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. असे आमदार तरे यांनी सांगितले. तसेच, वेळ असल्यास आम्ही आमच्या जातीची राजीनामा देखील देऊ.

सभेत इतर वक्त्यांनीही आदिवासी संस्कृती टिकवा तरच आरक्षण टिकेल! असा संदेश देत समाजाला एकतेचे आवाहन केले. या मोर्चात विविध आदिवासी संघटना, दलित संघटना, तसेच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. आदिवासी युवकांनी पारंपरिक पोशाखात आणि झेंड्यांसह मोर्चात सहभाग घेतला. काही संघटनांनी सांस्कृतिक नृत्य आणि घोषणांद्वारे आंदोलनाला सांस्कृतिक रंग दिला.

सभेचा शेवट 'जय जोहार! जय आदिवासी!' या घोषणांनी झाला. मोर्चाचे शांततेत पण निर्धारपूर्वक आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण पालघर जिल्ह्यात या आंदोलनाची चर्चा रंगली असून, आदिवासी समाजाच्या हक्क रक्षणासाठी हे आंदोलन उत्तम ठरेल, असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती, जिल्हा पालघर अध्यक्ष आमदार विलास तरे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार हरिश्चंद्र भोये, माजी खासदार बळीराम जाधव, वैदही वाढाण, जगदीश धोडी, रमेश सवरा, ॲड. विराज गडग, संतोष बुकले, अशोक शिंगाडा, प्रसाद पऱ्हाड, प्रतिभा गुरोडा, डॉ. सुनील पऱ्हाड, दत्ताराम करबट, किर्ती वरठा, ॲड. मीना धोदडे आदी आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक यूट्यूबर्स देखील उपस्थित होते.

### आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीच्या प्रमुख मागण्या -

१) बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जमाती मध्ये समावेश करू नये.

२) आदिवासी ते बिगर आदिवासी जमीन हस्तांतरणास विरोध.

३) बोगस आदिवासींना मिळालेले अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र त्वरीत रद्द करणेत यावे.

४) पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी त्वरीत करावी.

५) जिल्हा परिषेदेच्या सभागृहाला निसर्गवासी काळुराम काकड्या धोदडे (काका) यांचे नाव देण्यात यावे.

## शिळफाटा येथील आधार केंद्र जागेअभावी बंद ! आता तरी प्रशासन दखल घेईल का?

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, शिळफाटा (ठाणे) :** शिळ परिसरातील आधार केंद्र बंद पडला आहे, शासकीय कार्यालयात जागा उपलब्ध करून देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला हरताळ फासण्यात आला आहे, त्यामुळे शिळफाटा परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे. या बाबत संबंधित यंत्रणांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने नाराजीचा सूर उमटला आहे.

उच्च न्यायालयाने आधार कार्डची सक्ती करू नये, असे आदेश दिले असले तरी आजही बँक खाते, मोबाइल नंबर, कर्ज, रेशन कार्ड तसेच इतर कारणाकरिता लिंक करण्याकरिता आधारची मागणी केली जाते, याशिवाय सरल डाटासाठी विद्यार्थ्यांना आधाराची आवश्यकता आहे. ई-सेवा केंद्रात आधार कार्ड काढून दिले जात असे. त्यानंतर पोस्ट कार्यालयात आधार कार्ड नोंदणी सुविधा करण्यात आली. शिलफाटा परिसराचा विचार केला तर बऱ्याच ठिकाणी आधार कार्ड केंद्र होती. मात्र, खासगी ठिकाणी असलेली ही केंद्र शासकीय कार्यालयात स्थलांतरित करण्यात आली. ४ वर्ष शिळफाटा येथील आरोग्य केंद्र या ठिकाणी आधार केंद्र सुरू होते. प्रभाग क्रमांक २९ मधील सर्व नागरिकांना त्याचा लाभ होत होता. आधार कार्ड वरील नाव बदलणे, जन्मतारीख बदलणे, पत्ता बदलणे, आधार कार्ड अपडेट करणे, नवीन आधार कार्ड बनवणे अनेक कामे या आधार केंद्रांमध्ये चालू होती. मात्र दोन वर्षापासून ही कामे सर्व बंद झाली आहेत. जुने आरोग्य केंद्र तोडल्यामुळे आधार केंद्राला जागा मिळाली नाही. आता त्या ठिकाणी नव्याने आरोग्य केंद्र बांधण्यात आला आहे. मात्र त्या ठिकाणी आरोग्य केंद्रात जागा नसल्यामुळे दोन वर्ष आधार कार्ड सेंटर बंद आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार, आयुक्त, जिल्हाधिकारी, तलाठी यांनी दखल घेऊन हे आधार सेंटर चालू करावे अशी नागरिकांनी मागणी केली आहे.

## १६ ऑक्टोबरला 'धम्मचक्र अनुवर्तन दिना' निमित्ताने सार्वजनिक सुट्टी जाहीर करा

### खा. प्रतिभा धानोरकर यांची प्रशासनाला ठाम मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** रक्ताचा एकही थेंब न सांडता चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर महामानवाच्या एका शब्दावर १६ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली हा दिन चंद्रपूर शहराच्या इतिहासात एक अविस्मरणीय क्षण म्हणून नोंदविला गेला यानिमित्ताने दरवर्षी बौद्ध अनुयायांना दीक्षाभूमीवर अस्थीकलशचे दर्शन घेता यावे म्हणून जिल्हाधिकारी सुट्टी घोषित करायचे मात्र यावर्षी नकळतपणे की हेतूपूरस्पर सुट्टी घोषित केली गेली नाही या अनुषंगाने चंद्रपूरच्या ऐतिहासिक



दीक्षाभूमीवर १६ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देऊन सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू केला होता. तथापि, या दिवशी सार्वजनिक सुट्टी नसल्याने लाखो अनुयायांच्या धार्मिक आणि सामाजिक भावनांना धक्का पोहोचत असल्याचे कारण देत, खा.९ प्रतिभा धानोरकर यांनी नागपूर विभागीय आयुक्तांकडे १६ ऑक्टोबर ला चंद्रपूर जिल्ह्यासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याची ठाम मागणी केली आहे. हा विषय लाखो लोकांच्या श्रद्धा आणि सामाजिक भावनांशी निगडीत आहे. त्यामुळे प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून या ऐतिहासिक दिवसाला सार्वजनिक सुट्टी घोषित करावी, अशी आग्रही मागणी खा.धानोरकर यांनी केली आहे.

खा.धानोरकर यांनी प्रशासनाला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, दरवर्षी देशभरातून लाखो आंबेडकरी अनुयायी चंद्रपूर दीक्षाभूमीवर श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येतात. हा दिवस सामाजिक समतेचा आणि परिवर्तनाचा प्रतीक असून, शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना तसेच विविध आस्थापनांतील कामगारांना त्या दिवशी रजा मिळवणे कठीण जाते. त्यामुळे अनेकांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होता येत नाही, असे त्यांनी निदर्शनास आणले. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतल्यास, लाखो अनुयायांना शांततेत व उत्साहाने धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन साजरा करता येईल, असा विश्वास खा. धानोरकर यांनी व्यक्त केला आहे.

## आ. किशोर जोरगेवार यांनी घेतले साई पादुकांचे दर्शन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरात श्री साई पादुका दर्शन सोहळ्याचा भव्य उत्सव मोठ्या भक्तिभावाने पार पडला. शहरात सकाळपासूनच 'जय साईनाथ' चा गजर सुरू होता. या भक्तिमय वातावरणात दिनांक १३ ऑक्टोबर ला आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थिती दर्शवून श्री साई पादुकांचे दर्शन घेत साईबाबांच्या चरणी



चंद्रपूर जिल्ह्याच्या सुख-समृद्धीची प्रार्थना केली. यावेळी आवो साई पालखी सेवा समितीचे अध्यक्ष रवी अल्लेवार, दाताळा देवस्थानचे संस्थापक राजू नागरकर, भारतीय जनता पार्टीचे विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, युवती प्रमुख प्रियंका चिताडे, जितेंद्र इतगीरवार, नकुल वासमवार यांच्यासह आवो साई पालखी सेवा समिती आणि मंदिर समितीच्या विश्वस्तांची उपस्थिती होती. यावेळी आ.जोरगेवार यांनी साईबाबांच्या पादुकांचे पूजन करत साईबाबांच्या शिकवणीत दडलेला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश अधोरेखित केला. त्यांनी सांगितले की, साईबाबांचे तत्त्वज्ञान हे श्रद्धा, सबुरी आणि मानवतेचे प्रतीक आहे. साईबाबांनी शिकवलेला प्रेम, एकता आणि सेवा यांचा मार्ग आजच्या समाजाला एकत्र ठेवणारा आहे. अशा सोहळ्यांमधून समाजात भक्ती, सौहार्द आणि सकारात्मकता वाढते. आवो साई पालखी सेवा समिती, चंद्रपूर आणि दाताळा देवस्थान यांच्या वतीने दाताळा देवस्थान येथे आयोजित या सोहळ्याला शहरातील हजारो साईभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# थोडक्यात

## माणगाव तालुक्यामध्ये जिल्हास्तरावर क्षमता बांधणी प्रशिक्षणे आयोजित



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, माणगाव (रायगड) :** न्यू जनरेशन पाणलोट विकास प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत माणगाव तालुक्यातील गावांमध्ये पाणलोट विकास प्रकल्प सुरू झाले आहेत. यामध्ये क्षमता बांधणी घटकाअंतर्गत सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग - रायगड यांची निवड जिल्हा संसाधन संस्था (डी.आर.ओ), म्हणून निवड करण्यात आली आहे मोतीराम ब्लँकेट हॉल माणगाव जि.रायगड येथे जिल्हास्तरावर प्रशिक्षणे आयोजित करण्यात येत आहेत. मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा - महाराष्ट्र राज्य, जल भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) संभाजीनगर जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी तालुका कृषी अधिकारी (पी.आय.ए) जिल्हा प्रकल्प समन्वयक यांच्या सहकार्याने नियोजन करून जिल्हास्तरीय प्रशिक्षण देण्यात येत आहेत. तालुका कृषी अधिकारी रवी कावळे, किरण पडवळकर, डीटीसी पंकज पाटील, तसेच यंत्रणेचे अधिकारी कार्यक्रमास भेट देत आहेत.यामध्ये क्लस्टर क्र. ४,५,६ मध्ये ४८ ग्राम पंचायतीचे सरपंच/ अध्यक्ष पाणलोट समितीचे सचिव, पाणलोट विकास पथकाचे (सदस्य) डब्ल्यू डी.टी, शेतकरी उत्पादक संघाचे अध्यक्ष सचिव व सभासद जिल्हा प्रकल्प समन्वयक जिल्हास्तरीय प्रशिक्षणे आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल, बेसिक ट्रेनिंग, पायाभूत प्रशिक्षण अकाउंट प्रोसेस, वॉटर मॅनेजमेंट, शेतकरी उत्पादक संघाला फार्मर प्रोडूसर कंपनी बद्दल माहिती व शेती विषयक माहिती प्रोडक्शन विषयी माहिती, पिक व पाणी व्यवस्थापन, एकात्मिक शेती सेंद्रिय शेती, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक मधील महत्त्वाच्या तरतुदी, वैयक्तिक लाभ योजना, पाणलोट समितीची रचना व कार्य, वेगवेगळ्या प्रकारचे इन्शुरन्स बद्दल माहिती, इत्यादीवर प्रशिक्षण देण्यात आली मोठ्या संख्येने सचिव शेतकरी गटातील लाभार्थी सदस्य उपस्थित होते. प्रवीण प्रशिक्षक म्हणून गंगागिरी नरसिंग गिरी, विनोद कोरपे, सुरभी संस्थेचे अध्यक्षा सुप्रिया जेधे, किरण शिरगावकर, शशिकांत पवार, प्रशिक्षण देत आहेत. धीरज जेधे, रचना माने, संगीता पलंगे, नीलम वाडेकर प्रमोद जाधव, आकाश राऊत इंजिनियर, इंजि, असित शिंदे, नितेश पाटील, योगिता महाले, स्वप्निल शेडगे, इत्यादी पाणलोट विकास पथकातील सदस्य डब्ल्यूटी यांच्या सहकार्याने नियोजनबद्ध कार्यक्रम होत आहे.

## सातारा पंचायत समितीच्या ५ गणांमध्ये राजकीय चुरस वाढली

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१४, सातारा :** सातारा पंचायत समितीच्या आरक्षण सोडतीत कोडोली, कोंडवे, नागठाणे, लिंब, परळी हे राजकीयदृष्ट्या संवेदनशील गण खुले झाले असून, या ठिकाणी चुरस वाढणार आहे. सातारा पंचायत समितीच्या सभागृहात सोमवारी सकाळी ११ वाजता प्रांताधिकारी आशिष बारकुल, तहसीलदार समीर यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत सातारा पंचायत समिती गणांची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. सर्वप्रथम विभागीय आयुक्तांच्या अधिकारांतर्गत लोकसंख्येच्या निकषानुसार, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी अपशिंगे आणि खेड हे दोन गण आरक्षित करण्यात आले. यानंतर शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठी काढून सर्वप्रथम ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

## बदलापूर पोलिसांची तत्परता; ज्येष्ठ महिलेला २० लाखांचा ऐवज परत



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१४, बदलापूर :** बदलापूर पोलिसांच्या तत्पर कार्यवाहीमुळे एका ज्येष्ठ नागरिक महिला यांच्या हरविलेल्या सुमारे २० लाख रुपये किमतीच्या ऐवजाची परतफेड करण्यात यश आले आहे. घटनेत, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी संध्याकाळी सुमारास महिला नामे वंदना विश्राम चांदोसकर (वय ७७ वर्षे) या लँड ब्रिज येथून दिपाली पार्क येथे रिक्षाने जात असताना आपली पिशवी रिक्षामध्ये विसरल्या होत्या. त्या पिशवीमध्ये सुमारे १२ ते १४ तोळे सोने, चांदी तसेच रोख रक्कम असा एकूण २० लाख रुपये किमतीचा ऐवज होता. महिलांना ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ बदलापूर पश्चिम पोलीस ठाणे गाठले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांनी तातडीने गुन्हे शोध पथकाचे पो. उपनिरीक्षक पाथरे व त्यांच्या पथकाला तपासाचे आदेश दिले. पथकाने तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फूटेज व स्थानिक चौकशीतून रिक्षा क्रमांक MH05 DL 8799 शोधून काढली. संबंधित रिक्षाचालक सुरेश कुंडलिक मढवी यांचा शोध घेऊन चौकशीत त्यांनी सदर पिशवी प्रामाणिकपणे परत दिली. या कामगिरीत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उपनिरीक्षक पाथरे, पो.हवा.सचिन जाधव, अनिल बालनोथ, किरण जिरे, महादेव कसबे, पोशी. निखिल निगडीकर, सचिन चव्हाण व शशिकांत पाटील यांनी विशेष योगदान दिले. पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या तत्पर आणि प्रभावी कार्यवाहीबद्दल नागरिकांनी बदलापूर पोलिसांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## बारड येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथ वाचनाचा समारोप

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथील ज्ञानदीप नगर येथे पंचशील महिला मंडळाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचन वर्षेवास निमित्त उत्साहपूर्ण वातावरणात समारोप करण्यात आला. बारड येथे मंगळवार, दि.१४ ऑक्टोबर मंगळवार रोजी ज्ञानदीपनगर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वर्षेवास निमित्त सतत ३ महिने सार्वजनिक वाचन करण्यात आले. ग्रंथाचे वाचन मानसी आठवले,खुशी आठवले यांनी केले. मंगळवारी ग्रंथ वाचन समारोप करण्यात आले असून बुद्ध वंदना, त्रिशरण, पंचशील पठन करण्यात आले आहे. पूज्य भदंत बोध्दी धम्मो यांनी प्रवचन, धम्मदेशना केली. धम्म उपदेश करतांना भदंत म्हणाले की तथागत भगवान बुद्धाचा धम्म हा मानवी जीवनाच्या कल्याणाचा मार्ग आहे सर्वांनी बुद्ध तत्त्वज्ञान अंगीकार करून आचरणात आणावे सर्वांशी प्रेमाचे,मैत्रिचे आचरण करावे असा उपदेश दिला आहे.या समारोप कार्यक्रमा निमित्ताने खीरदान,भोजनदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम बौद्ध उपासक उपासिका युवक यांनी परिश्रम घेतले आहे.